यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_hsc@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2230718

आरोग्य विज्ञान विद्याशाखा / School of Health Sciences

**Date: 30.03.2026**

# राष्ट्रीय डाऊन सिंड्रोम परिषद अहवाल

जागतिक डाउन सिंड्रोम दिनाच्या निमित्ताने तसेच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून डाउन सिंड्रोम केअर असोसिएशन (भारत) व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 व 22 मार्च 2026 रोजी नाशिक येथे राष्ट्रीय डाऊन सिंड्रोम परिषद यशस्वीपणे आयोजित करण्यात आली.

या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट डाऊन सिंड्रोम विषयाला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देणे, आयुष्याच्या विविध टप्प्यांनुसार संरचित काळजी मॉडेल विकसित करणे, डॉक्टर व व्यावसायिकांना अनुभवाधारित व शैक्षणिक प्रशिक्षण देणे तसेच डाऊन सिंड्रोम असलेल्या व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांसाठी राष्ट्रीय स्तरावर सहाय्य व्यवस्था उभारणे हे होते.

दिनांक 21 मार्च 2026 रोजी परिषदेचा पहिला दिवस विविध उपक्रमांनी संपन्न झाला. यामध्ये उद्घाटन समारंभ, डॉक्टरांना कुटुंबांसोबत जोडणारी अनुभवाधारित कार्यशाळा, डाऊन सिंड्रोम असलेल्या व्यक्तींसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, तज्ज्ञ व पालक यांच्यातील संवाद सत्रे तसेच सांस्कृतिक कार्यक्रम व सत्कार समारंभ यांचा समावेश होता.

दिनांक 22 मार्च 2026 रोजी "Integrating Care, Genetics and Inclusion" या विषयावर राष्ट्रीय CME (Continuing Medical Education) चे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये प्रतिबंध, निदान, वैद्यकीय उपचार, थेरपी, समावेशन व धोरणात्मक बाबी यांवर सखोल चर्चा करण्यात आली. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पॅनल चर्चा तसेच समारोप व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाने परिषदेची सांगता करण्यात आली.

या परिषदेमध्ये सुमारे 60 कुटुंबांचा सहभाग नोंदविण्यात आला असून एकूण सुमारे 250 सहभागी उपस्थित होते. आरोग्य तपासणी शिबिरामध्ये सुमारे 18 ते 20 तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग घेतला. अनुभवाधारित कार्यशाळा व CME मध्ये 40 डॉक्टर प्रतिनिधी सहभागी झाले. याशिवाय सुमारे 30 तज्ज्ञ व्याख्याते, 12 मान्यवर तसेच 30 स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे अनुभवाधारित शिक्षण पद्धती होय. प्रत्येक डॉक्टर प्रतिनिधीला एका कुटुंबासोबत जोडण्यात आले होते, ज्यामुळे डॉक्टरांना कुटुंबांच्या दैनंदिन जीवनातील आव्हाने, भावनिक परिस्थिती तसेच वैद्यकीय गरजा प्रत्यक्ष अनुभवता आल्या. यामुळे डॉक्टरांमध्ये अधिक संवेदनशीलता व व्यावहारिक समज निर्माण झाली.

आरोग्य तपासणी शिबिरामध्ये बहुवैद्यकीय पद्धतीने तपासण्या करण्यात आल्या व सहभागी कुटुंबांना तत्काळ मार्गदर्शन तसेच पुढील उपचारांसाठी सूचना देण्यात आल्या. तसेच CME च्या माध्यमातून प्रमाणित उपचार पद्धती, आयुष्यभराचा काळजी दृष्टिकोन व वैद्यकीय-सामाजिक समन्वय यावर भर देण्यात आला.

या परिषदेमुळे राष्ट्रीय स्तरावर डॉक्टर, तज्ज्ञ व पालक यांचे एक सक्षम जाळे निर्माण झाले असून विविध भागांमध्ये डाऊन सिंड्रोम क्लिनिक व सहाय्य केंद्रे उभारण्याबाबत सकारात्मक पुढाकार घेण्यात आला.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांनी सभागृह, निवास व्यवस्था, भोजन, अंतर्गत वाहतूक, काही मान्यवरांच्या प्रवासासाठी सहाय्य तसेच प्रशासकीय व तांत्रिक सहकार्य दिले. तसेच डॉ. रश्मी रानडे व डॉ. जयदीप निकम यांचे मार्गदर्शन व सहकार्य परिषदेच्या यशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

या परिषदेमुळे जागरूकतेपासून कृतीकडे जाणारा महत्त्वपूर्ण टप्पा साध्य झाला असून एक संरचित राष्ट्रीय काळजी मॉडेल विकसित करण्याचा पाया रचला गेला आहे. पुढील काळात प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणे, प्रादेशिक केंद्रे स्थापन करणे, पालक सक्षमीकरण कार्यक्रम राबविणे तसेच डॉक्टरांचे सातत्याने प्रशिक्षण आयोजित करणे यावर भर देण्यात येणार आहे.

ही परिषद भारतामध्ये डाऊन सिंड्रोम असलेल्या व्यक्तींसाठी समावेशक, समन्वित व शाश्वत आरोग्य व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे.

आरोग्य विज्ञान विद्याशाखा ★ य.च.म.मु.वि. नाशिक ★ ज्ञानगंगा घरोघरी आविशा

**डॉ. रश्मी रानडे**
संचालक (प्र.)
आरोग्य विज्ञान विद्याशाखा

**संचालक**
**आरोग्य विज्ञान विद्याशाखा**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**


NATIONAL CONCLAVE ON DOWN SYNDROME
WORLD DOWN SYNDROME DAY 2026
From Families to Frontline Care
Integrating Care, Genetics & Inclusion Across the Lifespan
21–22 March 2026
Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU), Nashik
Organised by
Down Syndrome Care Association (India)
Institute of Medical Genetics (IMG)
In Collaboration with
Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU)
DSCA
INSTITUTE OF MEDICAL GENETICS


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao Chavan Maharashtra University



आरोग्य विज्ञान विद्याशाखा
School of Health Sciences


12





mputer Science
(6)
Dr. Namita Chopade
Dermatologist
6
(7)




IN
CMS
Cipla